अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. १२ जुलै २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : २८३ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


## गेमिंग महागले, औषध स्वस्त होणार; जीएसटी कौन्सिलचा निर्णय

**नवी दिल्ली** : जीएसटी परिषदेच्या आज झालेल्या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. ऑनलाईन गेमिंग, हॉर्स रेसिंग आणि कॅसिनोवर २८ टक्के जीएसटी लागू होणार आहे. जीएसटी कौन्सिलच्या ५० व्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे.

जीएसटी कायद्यात सुधारणा केल्यानंतर हे नवीन कर लागू होणार आहेत. जीएसटी कौन्सिलने सिनेमाच्या तिकिटांसह पॉपकॉर्न आणि कोल्ड्रिंक्ससारख्या खाद्यपदार्थांवर जीएसटीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आता या सर्व गोष्टी कॉम्पोझिट सप्लाय म्हणून




गणल्या जाणार आहेत. त्यामुळे सिनेमाच्या तिकीटाप्रमाणेच कर आकारला जाणार आहे. याचाच अर्थ सिनेमागृहातील रेस्टॉरंटमधील खाण्यापिण्यावर आता ५ टक्के जीएसटी भरावा लागणार आहे. यापूर्वी १८ टक्के जीएसटी लागू होता. जीएसटी कौन्सिलने अपीलीय न्यायाधिकरणाच्या स्थापनेलाही मान्यता दिली आहे.जीएसटी कौन्सिलच्या बैठकीबाबत माहिती देताना अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी सांगितले की, चार वस्तूंचे जीएसटी दर कमी करण्यात आले आहेत. फिश पेस्टवरील जीएसटी १८ टक्क्यांवरून ५ टक्के करण्यात आला आहे. जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत कर्करोगावरील औषधांच्या आयातीवरील जीएसटी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासोबतच विशेष औषधांसाठी औषध आणि अन्नावरील आयजीएसटी ही रद्द करण्यात आला आहे. जीएसटी कौन्सिलच्या या निर्णयामुळे कॅन्सरवरील औषध ची आयात स्वस्त होणार आहे.

# प्रायमरी शिक्षणाचा ‘खेळखंडोबा’ शाळांचा ताबा घेणार ‘आजोबा’

■ शासनाची डोळेझाक; ‘बैल गेला झोपा केला’...

■ राज्यात तब्बल १८ हजार ४६ पदे रिक्त

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**राज्यात प्राथमिक शिक्षणाचा खेळखंडोबा होतो आहे. राज्यात जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये तब्बल १८ हजार ४६ शिक्षकांची पदे रिक्त आहेत. त्याकडे ना सरकारचे लक्ष. ना सरकारी बाबूंचे. एखाद्या गंभीर प्रश्नाकडे शासनाची डोळेझाक झाली तर तो किती उग्र रूप धारण करतो, याचे एक चिंताजनक उदाहरण राज्यासमोर आले आहे. राज्यातील प्राथमिक शाळा मोठा गाजावाजा करत सुरु केल्या पण झेडपीच्या शाळांमध्ये शिकवण्यासाठी शिक्षकच नाहीत, अशी विदारक स्थिती समोर आलीय. ‘बैल गेला... झोपा केला’, अशातला हा प्रकार आहे. ही बाब नजरेसमोर येताच शासन खडबडून जागे झाले आणि कंत्राटी पद्धतीने सेवानिवृत्त शिक्षकांची नियुक्ती करण्याचा आदेश दिला गेला आहे. या शिक्षकांची वयोमर्यादा ७० पर्यंत ठेवण्यात आल्याने या शाळांचा डोलारा आता आजोबारूपी शिक्षक सांभाळतील.**




राज्यातील शिक्षणाचा दर्जा कसा खालावला आहे, याचा एक अहवाल सोमवारी प्रसिद्ध झाला. त्याविषयी शिक्षण क्षेत्रातून चिंता व्यक्त होत असतानाच मंगळवारी ही एक धक्कादायक माहिती उजेडात आली. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून सेवानिवृत्त शिक्षकांची कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. शिक्षण विभागाकडून कंत्राटी भरतीसाठी जीआर काढण्यात आला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे काही प्रश्न उपस्थित झाले आहेत. निवृत्त असणारे कमाल ७० वर्षांचे शिक्षक का घेतले जात आहेत? नवीन तंत्रज्ञान अवगत असणाऱ्या शिक्षकांना संधी का नाही ? यासारखे प्रश्न सरकारच्या या निर्णयामुळे उपस्थित झाले आहेत. सात जुलै रोजी याबाबत सरकारकडून परिपत्रक जारी करण्यात आले आहे. त्यानुसार, महाराष्ट्रात सर्व जिल्हा परिषद शाळांत पुढील १५ दिवसांमध्ये कंत्राटीपध्दतीने भरती करण्यात यावी, अशी सूचना राज्यातील झेडपींच्या प्रशासनाला करण्यात आली आहे. शिक्षकांना २० हजार रुपये मानधन देण्यात येणार आहे.

### सदर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्ष

- मानधन २० हजार रुपये प्रतिमहिना (कोणत्याही इतर लाभांशिवाय)
- जिल्हा परिषदेच्या वतीने शिक्षणाधिकारी यांच्याशी करारनामा स्वाक्षरीत करावा
- प्रत्येक जिल्ह्यांसाठी संबधित शिक्षणाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी पात्र, इच्छुक उमेदारांकडून अर्ज मागवून नियुक्ती आदेश द्यावेत.
- संबंधित शाळेतील रिक्त शिक्षकीय पदाची गरज लक्षात घेऊन त्याप्रमाणे अत्यावश्यक पदावर नियुक्ती देण्यात यावी
- नियमित शिक्षक उपलब्ध होईपर्यंत नियुक्ती असेल नियुक्त्या १५ दिवसात पूर्ण कराव्यात
- सदर बाबींवर होणारा खर्च मंजूर अनुदानातून भागवण्यात यावा

### करारनामा करणार...

सेवानिवृत्त शिक्षकांच्या तात्पुरत्या नियुक्तीसाठी कमाल वयोवर्यादा ७० वर्ष ठेवण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यासाठी प्राथमिक शिक्षणाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पात्र आणि इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागवून नियुक्ती आदेश देण्यात येणार आहेत. शिक्षकांची नियुक्तीची सर्व प्रक्रिया आयुक्तांच्या नियंत्रणाखाली होईल. कंत्राटी शिक्षकांना नियुक्त करताना शिक्षणाधिकाऱ्यांबरोबर करारनामा करावा लागणार आहे.

### ... या असणार आहेत तरतुदी

नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत, स्थानिक स्वराज्य संस्थाच्या शाळांतील आणि खासगी शिक्षण संस्थांच्या अनुदानित शाळातील सेवानिवृत्त शिक्षकांमधून कंत्राटी तत्त्वावर तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा परिषद शाळातील रिक्त शिक्षकीय पदे भरण्यात येणार आहेत.

### जिल्ह्यातील शाळांची व शिक्षकांची संख्या

सोलापूर जिल्ह्यातील एकूण शाळांची संख्या २ हजार ७९५ जिल्ह्यातील एकूण शिक्षकांची संख्या ८ हजार ८८२ असून सध्या जिल्ह्यात शिक्षकांची रिक्त पदे ५५० इतकी आहेत.

### काय करणार आहे सरकार?

शिक्षक भरतीवर २०११ पासून बंदी घातली होती.ती २०१९ मध्ये उठवली. बंदी उठून पाच वर्षांचा कालावधी लोटूनही अद्याप शिक्षकांच्या रिक्त जागांची भरती सुरु झालेली नाही. बालकांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण कायद्यातील तरतुदीनुसार प्रत्येक ३० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक असे अनिवार्य आहे. याच नियमाच्या आधारानुसार सध्या राज्यात १८ हजार ४६ जागा रिक्त आहेत. राज्यातील सर्व शाळा ह्या जून महिन्यात सुरु झालेल्या आहेत. भरती संदर्भात उच्च न्यायालयात दाखल रिट याचिकांमुळे भरती प्रक्रियेस विलंब होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे. ही परिस्थिती विचारात घेऊन पवित्र प्रणालीमार्फत नियमित शिक्षक भरतीमधून शिक्षक उपलब्ध होईपर्यंत जिल्हा परिषद शाळांतील रिक्त शिक्षक पदे भरण्यात येणार आहे.

## मठात गांजा ओढण्यास नकार दिल्याने साधूंवर जीवघेणा हल्ला; तिघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर

शहरातील मध्यवर्ती भागात असलेल्या मंदिरा जवळील मठात गांजा ओढण्यास साधूंनी आणि महंतांनी गर्दुल्यांना विरोध केला. याचा राग मनात धरून गर्दुल्यांनी साधूंवर शसस्त्र हल्ला करून गंभीर जखमी केले आहे. समाजकंटकांच्या टोळक्याने महंतावर सशस्त्र हल्ला केल्याने सोलापुरात खळबळ उडाली आहे. दि.१० जुलै रोजी सोमवारी दुपारी हा प्रकार घडल्यानंतर जखमी महंतास छत्रपती शिवाजी महाराज सर्वो पचार शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

राम कृपाळू दास महाराज (वय-५३) असं जखमी महंताचे नाव आहे. सोलापूर एसटी स्थानकापासून जवळच असलेल्या मुरारजी पेठेत निराळे वस्ती रस्त्यावर राज राजेश्वरी हनुमान मंदिर आहे.या मंदिरात साधूंचा मठ असून तेथे देशाच्या विविध भागातून आलेले साधू,महंत वास्तव्य करतात.या मठात गोंधळ झाल्याने साधू संतांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेची दखल घेत तिघांचा शोध घेत असल्याचे फौजदार चावडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वनाथ सिद यांनी बोलताना सांगितले.

## कुंभारी घरकुल येथे विवाहित इसमाची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर



कुंभारी घरकुल (ता.दक्षिण सोलापूर) येथे राहणाऱ्या एका ४२ वर्षीय इसमाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना मंगळवारी सायंकाळच्या सुमारास उघडकिस आली.

रमेश कृष्णहरी मुनगापाटील (वय ४२ रा. नवीन घरकुल कुंभारी) असे मयताचे नाव आहे. सायंकाळी साडेचार वाजेच्या सुमारास त्याने राहत्या घरातील छताच्या पंख्याला साडीने गळफास घेतला होता. मयत रमेश मुनगापाटील हा फेरीचा व्यवसाय करीत होता. त्याच्या पश्चात पत्नी आणि तीन मुले असा परिवार आहे. आज सकाळी त्याची पत्नी नातेवाईकाकडे गेली होती. तर मुले घराबाहेर खेळत असताना त्यांनी हा प्रकार केला. या घटनेची नोंद वळसंग पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. सहाय्यक फौजदार रावडे पुढील तपास करीत आहेत.

### दादांचे बंड त्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराचा वाद


## भाजप शहर-जिल्हाध्यक्षांच्या निवडी रखडल्या

सुराज्य/सोलापूर

अजितदादांचे बंड आणि शिंदे-फडणवीस सरकारमध्ये त्यांचा सहभाग तसेच आता मंत्रिमंडळ विस्तारावरून सुरू असलेला गोंधळ यामुळे भारतीय जनता पक्षाच्या शहराध्यक्ष आणि जिल्हाध्यक्षांच्या निवडी रखडल्या जात आहेत. त्यामुळे इच्छुकांमध्ये घालमेल सुरू आहे.

मे महिन्यात भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे सोलापूर दौऱ्यावर आले होते, त्यावेळी त्यांनी शहर आणि जिल्हाध्यक्ष बदलण्याचे संकेत दिले होते. त्यामुळे मे किंवा जूनमध्ये शहराध्यक्ष निवड होईल अशी चर्चा होती. मात्र त्याच दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्याकाळाला ९ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल भाजपाचे महाजनसंपर्क अभियान महिनाभर झाले. त्यामुळे या निवडी लांबल्या, हे अभियान संपल्यानंतर निवडी होतील असे वाटत असतानाच अजित पवार यांनी राष्ट्रवादीत बंड केले आणि थेट शिंदे- फडणवीस सरकारमध्ये एंट्री केली. त्यामुळे राजकीय भूकंप झाला. भाजपचे सर्व नेते या प्रकरणातच गुंतून पडले. आता सध्या मंत्रिमंडळ विस्ताराचा वाद सुरू झाला आहे. यात भाजपला २० ते २२ मंत्रिपदे मिळतील असे वाटत होते, मात्र अजितदादांमुळे ती संख्या १४-१५ पर्यंत खाली आली आहे. त्यामुळे प्रत्येक आमदार वरिष्ठाकडे मंत्रिपदाची फिल्डींग लावत आहे. या सर्व बाबींमुळे शहर आणि जिल्हाध्यक्षपदाच्या निवडी मात्र रखडल्या जात आहेत. सोलापुरात शहर अध्यक्ष निवडीच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातील काही स्थानिक नेत्यांनी मुंबई गाठून लॉबिंग केले होते, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतली होती. शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांच्यासह अनंत जाधव, हेमंत पिंगळे, नरेंद्र काळे, चन्नवीर चिट्टे यांची नावेही चर्चेली जात आहेत. हे सर्व नेतेही निवड कधी होणार याकडे लक्ष ठेवून आहेत.

### जिल्हाध्यक्षपदासाठी आ.कल्याणशेट्टीच दावेदार



भाजपाने दोन जिल्हाध्यक्ष करण्याचे ठरवले आहे. पूर्व विभागासाठी आ. सचिन कल्याणशेट्टीच दावेदार आहेत. सध्या त्यांच्याकडेच जिल्हाध्यक्षपद आहे. मात्र त्यांनी मतदारसंघाकडे लक्ष देण्यासाठी पदातून मुक्त करावे असे वरिष्ठांकडे कळवले आहे. असे असले तरी सध्या वरिष्ठपातळीवर आ. कल्याणशेट्टी यांना बदलण्याचा कोणताही विचार नसल्याची माहिती आहे. त्यामुळे तेच या पदावर कायम राहतील असे बोलले जात आहे.

## कोर्टात युवा वकिलाला हृदयविकाराचा झटका

सुराज्य/सोलापूर :

कोर्टातच काम करत असताना एका युवा वकिलाचा हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले.ॲड.श्रीकांत डमडेरे (वय ३६) असे निधन झालेल्या वकिलाचे नाव आहे. ही घटना मंगळवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास घडली. डमडेरे कोर्ट परिसरातील पार्किंगजवळ खाली कोसळले. खासगी हॉस्पिटलमध्ये उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

## वाळू चोराची धक्काबुक्की; तलाठी, पोलीस पाटील जखमी

सुराज्य/सोलापूर

नदीत मधून वाळू चोरी करणाऱ्यावर कारवाई करण्यास गेलेल्या तलाठी आणि पोलीस पाटील यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून धक्काबुक्की केल्याने दोघेजण जखमी झाले. ही घटना पोटेगाव (ता.करमाळा ) येथे सोमवारी पहाटेच्या सुमारास घडली.

या प्रकरणात करमाळ्याच्या पोलिसांनी तिघांविरुद्ध शासकीय कामात अडथळा, चोरी आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात मयूर चंद्रकांत क्षीरसागर राहणार (करमाळा) या तलाठ्याने करमाळा पोलिसात फिर्याद दाखल केली . त्याप्रमाणे पोलिसांनी गणेश रवींद्र शिंगटे, श्रीराम गिरी (दोघे रा.घारगाव) आणि आजिनाथ बागडे (रा.पोटेगाव ता. करमाळा ) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

या संदर्भात मिळालेली माहिती अशी पोटेगाव येथील सिना नदीतून वाळू चोरी होत असल्याचीमाहिती मिळाल्यानंतर तलाठी क्षीरसागर, मंडळ अधिकारी अनिल ठाकर, पोलीस पाटील अंकुश शिरगिरे आणि दत्तू अडसूळ (कोतवाल) असे चौघेजण सोमवारी पहाटे एक वाजेच्या सुमारास तरटगाव येथे गेले. त्यानंतर पोटेगाव येथ गेले असता नदीतून ट्रॅक्टरद्वारे वाळू चोरी करीत असल्याचे आढळले. क्षीरसागर यांनी ट्रॅक्टर अडविण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने त्यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालण्याचा प्रयत्न करून पसार झाला. यावेळी झालेल्या झटापटीत पोलीस पाटील शिरगिरे आणि तलाठी क्षीरसागर हे जखमी झाले. पुढील तपास सहाय्यक निरीक्षक टिळेकर करीत आहेत.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आता तूही तुझीच मनमानी कर !

| कल्याण |
| --- |
| 159-53-157 |

| मुंबई |
| --- |
| 569-03-599 |

## आता बाराजणांना लागणार आमदारकीची लॉटरी

सुराज्य/मुंबई

महाविकास आघाडी सरकारच्या काळापासून सातत्याने चर्चेचा विषय ठरलेल्या विधानपरिषदेतील १२ आमदारांच्या नियुक्तिबाबत सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. न्यायालयाने राज्यपालनियुक्त आमदारांच्या नियुक्तिला विरोध करणारी याचिका मागे घेण्यास परवानगी दिल्याने आता शिंदे-फडणवीस सरकारला विधानपरिषदेवर १२ आमदारांची नियुक्ति करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी सरकारला जलद हालचाली कराव्या लागतील.

१२ आमदारांची शिफारस करणारे पत्र राज्यपालांना पाठवून त्यांची मंजुरी त्याला मिळवावी लागेल. कारण, आमदारांच्या नियुक्तिला विरोध करणारी नवी याचिका दाखल झाल्यास १२ आमदारांच्या नियुक्तिला पुन्हा स्थगिती मिळू शकते. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार स्थापन झाल्यापासून राज्यपालनियुक्त १२ आमदारांच्या नियुक्तिचा मुद्दा प्रलंबित आहे. जून २०२० पासून विधानपरिषदेतील या १२ आमदारांची नियुक्ति रखडली होती. सप्टेंबर २०२२ मध्ये न्यायालयाने आमदारांच्या नियुक्तिला स्थगिती दिली होती. मविआ सरकारच्या काळात राज्य मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर १२ सदस्यांची यादी तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडे पाठवण्यात आली होती. मात्र, भगतसिंह कोश्यारी यांनी या यादीला मंजुरी दिली नव्हती. अने२कदा दाद मागूनही राज्यपाल कोश्यारी यांनी १२ आमदारांची नियुक्ती केली नव्हती. यावरुन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यात शीतयुद्धही रंगले होते. मात्र, मविआ सरकार जाईपर्यंत १२ आमदारांच्या नियुक्तिचा प्रश्न तडीस गेला नव्हता. परंतु, आता न्यायालयाने आमदारांच्या नियुक्तिला विरोध करणारी याचिका मागे घेण्याची परवानगी दिल्याने तांत्रिकदृष्ट्या १२ आमदारांची नियुक्ति करण्यात कोणताही अडथळा नाही. यानिमित्ताने आता विधिमंडळात आणखी १२ जणांना संधी मिळू शकते. यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार गट, शिंदे गट आणि भाजपमधील इच्छूक नेत्यांकडून पुन्हा एकदा लॉबिंग सुरु होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी काळात काय घडामोडी घडतात, याकडे राजकिय वर्तुळाचे लक्ष लागून राहणार आहे.

**नेमकं प्रकरण काय? :** नाशिकमधील सामाजिक कार्यकर्ते रतन सोली यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल करून या नियुक्ती करण्याचे राज्यपालांना आदेश द्यावे, अशी मागणी याचिकेद्वारे केली होती. मात्र न्यायालयाने आम्ही राज्यपालांना आदेश देऊ शकत नसल्याचे मत त्यावेळी नोंदवले होते. यानंतर सोली यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. याच काळात महाविकास आघाडीचे सरकार कोसळले होते. त्यानंतर शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आले. नवीन सरकारने नवीन लोकांची यादी राज्यपालांना दिली. तेव्हाच याचिकाकर्ते रतन सोली यांनी ही याचिका मागे घेण्याच्या हालचाली सुरू केल्या होत्या. या पार्श्वभूमीवर कोल्हापूरचे ठाकरे गटाचे शहरप्रमुख सुनील मोदी यांनी सर्वोच्च न्यायालयात सहभाग याचिका दाखल केली होती. आता न्याायलायने रतन सोली यांना याचिका मागे घेण्यास परवानगी दिली आहे.



